उप संचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे यांच्या अधिपत्याखालील ५० खाटांच्या उप जिल्हा रुग्णालये, कासा, कर्जत व पेण येथील १२ अस्थाई पदांना मुदतवाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः अपदे २०१८/प्रक्र-१०५/आरोग्य ३(अ)
गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, १० वा मजला, ए विंग,
एल.टी.मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ०९ एप्रिल,२०१८.

वाचा :-

1) **शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांकः अपदे २०१७/प्रक्र-१३३/आरोग्य ३(अ), दि.२.२.२०१८.**
2) **सहसंचालक (रुग्णालय-राज्यस्तर),आरोग्य सेवा, मुंबई यांचे पत्र क्र.संआसे/कक्ष-३/टे५अ/२०१८-१९/ठाणे/अपदे/३०४१-४२/१८, दि.२३.०३.२०१८.**
3) **शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः पदनि २०१६/प्रक्र-८/१६/आ.पु.क. दि.०५.०३.२०१८.**

शासन निर्णय:-

संदर्भाधीन क्र.१ येथील शासननिर्णयान्वये उप संचालक, आरोग्य सेवा,मुंबई मंडळ,ठाणे यांच्या अधिपत्याखालील ५० खाटांच्या उप जिल्हा रुग्णालये, कासा, कर्जत व पेण येथील १२ अस्थायी पदांना दि.१.१.२०१८ दि.२८.२.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्यात आली होती.

संदर्भाधीन क्र.२ येथील प्रस्तावास अनुसरुन सदर पदांना दि.१.०३.२०१८ ते दि.३०.९.२०१८ या कालावधीसाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सदर १२ अस्थायी पदाना शासन निर्णय वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्रक्र-८/१६/आ.पु.क दिनांक ०५.०३.२०१८ मधील अटीच्या अधीन राहून दिनांक १.३.२०१८ ते ३०.०९.२०१८ या कालावधी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर पदांवरील खर्च खाली दर्शविण्यात आलेल्या लेखाशिर्षातून खर्ची टाकण्यात यावा आणि हा खर्च सन २०१८-१९ या वर्षाकरिता मंजूर झालेल्या अनुदानातून भागवण्यात यावा.

<u>मागणी क्रमांक-आर-१</u>

२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६ - सार्वजनिक आरोग्य
००१- संचालन व प्रशासन
(०१)(०९)- महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्पांतर्गत ग्रामीण / कुटीर रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयांमध्ये श्रेणीवर्धन (२२१० ४६२४)

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय,वित्त विभाग क्र. पदनि-२०१६ / प्र.क्र. ८/ १६/आ.पु.क.दि.५.३.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०६१०५९३८३८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.04.09 15:22:32 +05'30'

(रा.शा.कौरते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई नागपूर
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक,आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा, (रुग्णालय-राज्यस्तर) / (अ व प्र) मुंबई.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे.
६. जिल्हा शल्य चिकीत्सक, रायगड
७. वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय, कासा/कर्जत/पेण
८. जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड
९. वित्त विभाग व्यय-१३/ वित्तीय सुधारणा-१, मंत्रालय, मुंबई.
१०. कार्यासन अधिकारी, सेवा-२/सेवा-३/ सेवा-५/अर्थसंकल्प, सा.आ.वि. मंत्रालय,मुंबई.
११. निवडनस्ती (आरोग्य-३अ)

<u>विवरणपत्र</u>

उपसंचालक, आरोग्य सेवा, मुंबई मंडळ, ठाणे अंतर्गत ५० खाटांचे ३ उपजिल्हा रुग्णालयातील १२ अस्थाई पदे दि.१.३.२०१८ ते ३०.९.२०१८ पर्यंत पुढे चालू ठेवणेबाबत.

<table>
<tr><th>अ.
क्र.</th><th>पदनिर्मितीचा शासन निर्णय, क्रमांक व दिनांक</th><th>पदनाम</th><th>पद संख्या</th><th>वेतनश्रेणी</th><th>ज्या शासकीय आदेशान्वये पदे चालू ठेवली त्याचा क्रमांक व दिनांक</th><th>लेखाशिर्ष</th></tr>
<tr><td colspan="5">उपजिल्हा रुग्णालय, कासा, जि.पालघर</td><td rowspan="12">सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.अस्थायी २०१७/ प्र.क्र.१३३/ आरोग्य-३अ, दि.२.२.२०१८</td><td rowspan="12"><u>मागणी क्रमांक आर-१</u>
२२१०-वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य
०६- सार्वजनिक आरोग्य
००१- संचालन व प्रशासन
(०१) (०९) महाराष्ट्र आरोग्य सेवा विकास प्रकल्पांतर्गत ग्रामीण/कुटीर रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन.
(२२१० ४६२४)</td></tr>
<tr><td>१</td><td rowspan="3">शा.नि.क्र.जाबॅप्र २००३/ सीआर ३/ जाबॅक/ आ-४, दि.६.११.०४</td><td>अधिपरिचारीका</td><td>२</td><td>९३००-३४८००</td></tr>
<tr><td>२</td><td>औषध निर्माण अधिकारी वर्ग-३</td><td>१</td><td>५२००-२०२००</td></tr>
<tr><td>३</td><td>कक्षसेवक</td><td>१</td><td>५२००-२०२००</td></tr>
<tr><td></td><td colspan="4">उपजिल्हा रुग्णालय, पेण, जि.रायगड</td></tr>
<tr><td>१</td><td rowspan="3">शा.नि.क्र.जाबॅप्र २००३/ सीआर ३/ जाबॅक/ आ-४, दि.६.११.०४</td><td>अधिपरिचारीका</td><td>२</td><td>९३००-३४८००</td></tr>
<tr><td>२</td><td>औषध निर्माण अधिकारी वर्ग-३</td><td>१</td><td>५२००-२०२००</td></tr>
<tr><td>३</td><td>कक्षसेवक</td><td>१</td><td>५२००-२०२००</td></tr>
<tr><td></td><td colspan="4">उपजिल्हा रुग्णालय, कर्जत, जि.रायगड</td></tr>
<tr><td>१</td><td rowspan="3">शा.नि.क्र.जाबॅप्र २००३/ सीआर ३/ जाबॅक/ आ-४, दि.६.११.०४</td><td>अधिपरिचारीका</td><td>२</td><td>९३००-३४८००</td></tr>
<tr><td>२</td><td>औषध निर्माण अधिकारी वर्ग-३</td><td>१</td><td>५२००-२०२००</td></tr>
<tr><td>३</td><td>कक्षसेवक</td><td>१</td><td>५२००-२०२००</td></tr>
<tr><td></td><td>एकूण</td><td></td><td><u>१२</u></td><td></td><td></td><td></td></tr>
</table>